- अधिसूचना -

क्रमांक :- ४९/२०२३. दिनांक :- २४/०३/२०२३

विषय :- वाहतुक अधिकारी यांचे मानधन दराबाबत.

सर्व संबंधितांच्या माहितीकरीता अधिसूचित करण्यात येते की, दिनांक २३/१२/२०२२ रोजी झालेल्या वित्त व लेखा समितीने विषय क्रमांक १५ अन्वये, वाहतूक अधिकारी यांच्या मानधनामध्ये वाढ करण्यासंदर्भात केलेल्या शिफारसी, मा. कुलगुरूंनी महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठे कायदा २०१६ चे कलम १२(७) अंतर्गत व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दिनांक ०४/०१/२०२३ रोजी मान्यता प्रदान केलेली आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे जिल्हा संकलन केंद्रावरुन उत्तरपत्रिका आणणे या कामाकरीता फक्त विद्यापीठ आस्थापनेतील अधिकारी / कर्मचारी / कार्यालयीन व आस्थापनेवरील निवृत्त वाहन चालक यांना वाहतुक अधिकारी नेमल्यास खालील स्तंभ क्रमांक २ मध्ये दर्शविलेले वाहतुक अधिकारी यांना दैनंदिन भत्ता वगळून स्तंभ क्रमांक ३ मध्ये दर्शविलेले मानधन दर देय राहील. सदर दर मा. कुलगुरूंनी महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठे कायदा २०१६ चे कलम १२(७) अंतर्गत व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्य केलेल्या दिनांका पासुन म्हणजेच दिनांक ०४/०१/२०२३ रोजी पासुन अंमलात येतील.

अ.क्र.	पद / हुद्दा	मानधन / पारिश्रमिक	शेरा
१	२	३	४
१	वर्ग १ मधील नियुक्त अधिकारी	रुपये ५७०/-	प्रति दिन
२	वर्ग २ मधील नियुक्त अधिकारी	रूपये ५१०/-	प्रति दिन
३	वर्ग ३ मधील नियुक्त कर्मचारी व वाहन चालक	रूपये ४५०/-	प्रति दिन
४	वर्ग ४ मधील नियुक्त कर्मचारी	रूपये ४००/-	प्रति दिन

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती.